पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.शहर सुधारणा समिती**

कार्यपत्रिका क्रमांक – ०३

**सभावृत्तांत**

**दिनांक - ०९/१२/२०२०** **वेळ - दुपारी १२.३० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची **पाक्षिक** सभा **बुधवार** दिनांक **०९/१२/२०२०** रोजी दुपारी **१२.३०** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती.सदर सभेत खालील प्रमाणे सन्मा. सदस्य सभागृहात उपस्थित होते. तसेच काही सन्मा. सदस्य व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी झाले होते.

**१.मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे - सभापती**
२.मा.साधना अंकुश मळेकर
३.मा.अनुराधा गणपत गोरखे
४.मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर
५.मा.खानोलकर प्रज्ञा महेश

या शिवाय मा.अलमलेकर-सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.भालकर- सह शहर अभियंता, मा.पोरेड्डी-कार्य.अभियंता, मा.ऐवले- समाज विकास अधिकारी, मा.गायकवाड- जनसंपर्क अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.२) सभा आयोजनाबाबत.- मा.साधना मळेकर , मा.प्रज्ञा खानोलकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३) झोपडपट्टी धारकांकडून शुल्काची आकारणी व नोंद करणेबाबत.- मा.वैशाली घोडेकर मा.प्रज्ञा खानोलकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४) पंतप्रधान आवास योजनेसाठी घटक क्र.१ व PCSSIHDP अंतर्गत मे.M.M.Project Consultants Pvt.Ltd(सल्लागार) यांचेमार्फत राबविणेत येणा-या गांधीनगर प्रकल्पाचे पुनर्वसन/पुनर्निर्माण करणे – मा.वैशाली घोडेकर, मा.साधना मळेकर यांचा प्रस्ताव.

----------

ठराव क्रमांक – ०२ विषय क्रमांक - ०१
दिनांक - ०९/१२/२०२० विभाग – नगररचना व विकास
सुचक : मा.साधना मळेकर अनुमोदक : मा.अनुराधा गोरखे
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/१५/१६८/२०२० दि.०२/११/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची जुन्या हद्दीची सुधारित विकास योजना महाराष्ट्र शासनाचे आदेशक्र.टीपीएस।१८९३। १२७६ ।सीआर ।१९४।९३।युडी-१३, दि.१८ सप्टेंबर १९९५ अन्वये मंजूर करणेत आली आहे. मौजे पिंपरी वाघेरे येथील पिपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेमधील खालील तक्यात दर्शविलेल्या प्रस्तावित आरक्षणाचे भूसंपादन करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | आ. क्र. | आरक्षणाचे प्रयोजन | स.नं. / सि.स.नं. | बाधित होणारे संपादन करावयाचे एकुण सुमारे क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|---|
| १. | - | सुधारित मंजूर विकास योजनेतील १२ मी. रुंद रस्ता | सं.न. २२४ ते २२९ यामधिल सि.स.नं. १११०, १११९/१३ ते १११९/१६ ११६५, ११७०, ११८५, १२५४, १२६७/२ ते १२६७/५, १२६८, १२६८/१,१२६८/२, | ३०००.०० चौ.मी. |

तरी उपरोक्त प्रस्तावित प्रयोजनाखालील जमिन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम व नविन भूसंपादन अधिनियम २०१३ अन्वये संपादन करणेकामी सदर रस्त्याचा भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी,पुणे यांचेकडे पाठविणेस प्रस्तुत जमिनीचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व भूमीसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम - २०१३(नविन भूसंपादन कायदा २०१३) अन्वये संपादन करणेकामी मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता सदर ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – ०३ विषय क्रमांक - ०२

दिनांक – ०९/१२/२०२०

सुचक : मा.साधना मळेकर अनुमोदक : मा.प्रज्ञा खानोलकर

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीच्या पाक्षिक सभा प्रत्येक महिन्याचे पहिल्या व तिस-या मंगळवारी दुपारी २.३०वा. आयोजित करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ०४ विषय क्रमांक - ०३

दिनांक – ०९/१२/२०२०

सुचक : मा.वैशाली घोडेकर अनुमोदक : मा.प्रज्ञा खानोलकर

पिंपरी चिंचवड महापालिका शहरातील संपूर्ण झोपडपट्टी व ज्या झोपडपट्टी धारकांकडून झोपडपट्टी शुल्क करीता नोंदणीचा अर्ज आल्यास तो अर्ज झोपडपट्टी विभागाने स्विकारुन त्वरीत झोपडपट्टी ची नोंद करुन शुल्काच्या आकारणीची नोंद करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ०५ विषय क्रमांक - ०४

दिनांक – ०९/१२/२०२०

सुचक : मा.वैशाली घोडेकर अनुमोदक : मा.साधना मळेकर

पंतप्रधान आवास योजनेसाठी घटक क्र.१ व PCSSIHDP अंतर्गत गांधीनगर झोपडपट्टीचे पुनर्वसन/पुनर्निर्माण करणेकामी मे.M.M.Project Consultants Pvt.Ltd. यांची नेमणूक करणेस मा.स्थायी समिती ठराव क्र.७१२२ दि.२७/०५/२०२० मान्यता दिलेली आहे.

त्यास अनुसरुन दि.०७/०९/२०२० रोजी मे.M.M.Project Consultants Pvt.Ltd. यांना विषयांकित काम करणेस कामाचे आदेश देण्यात आलेले आहे. सल्लागार यांनी दि.१४/०९/२०२० रोजीचे पत्रान्वये गांधीनगर झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पाचे Draft Concept Report व Conceptual Design सादर केलेले आहे. सदर Draft Concept Report व Conceptual Design नुसार गांधीनगर पुनर्वसन प्रकल्पाची संक्षिप्त माहिती खालीलप्रमाणे आहे.

- विषयांकित पुनर्वसन प्रकल्प SRA कडील नियमावलीनुसार राबविण्यात येणार आहे.
- मशाल यांचेकडील २००२ चे सर्व्हेनुसार अस्तित्वात असलेल्या झोपडयांची संख्या -१४५०
- गांधीनगर झोपडपट्टीचे क्षेत्र -६२७१४.३० चौ.मी.
- पुनर्वसनासाठी विचारात घेतलेल्या(Google Map व Land Potential नुसार) =२०३२ सदनिका
- विक्रीसाठी बांधावयाच्या सदनिकांची संख्या- रहिवाशी ४७६ सदनिका+३४४ वाणिज्य सदनिका
- पुनर्वसनासाठी बांधकाम दर र.रु.३३६० प्रति चौ.फुट चटई क्षेत्रावर व र.रु.२१०० प्रति चौ.फुट Super Built up area
- विक्रीसाठीचा बांधकाम दर- र.रु.३५६० प्रति चौ.फुट चटई क्षेत्रावर व र.रु.२१०० प्रति चौ.फुट Super Built Up Area
- पुनर्वसनासाठी वापरण्यात येणारा F.S.I.-३.०
- बिल्डींगची उंची – ४० मी. पुनर्वसनासाठी, ७० मी. विक्रीसाठी
- पुनर्वसनाच्या जागा मालकांचा मोबदला- ५०% पर्यंत(Ready Reckoner)
- पुनर्वसनाच्या सदनिकेचे क्षेत्रफळ – ३०० चौ.फुट चटई क्षेत्र
- विक्रीसाठी क्षेत्रफळ ४५० चौ.फुट ते ६०० चौ.फुट चटई क्षेत्र
- प्रकल्पासाठी एकूण बांधकाम खर्च- र.रु.३८३.६१ कोटी
- सद्य:स्थितीत प्रकल्प किंमत र.रु.५०७.९० कोटी(Encroached Area समाविष्ठ करुन)
- लाभार्थ्यांना ट्रान्झिट कॅम्प व त्यासाठीच्या सुविधा मोफत पुरविणेत येणार
- ट्रान्झिट साठी स्थलांतरित करणेत येणा-या लाभार्थ्यांसाठी विकसकामार्फत घर भाडयाची लाईट, पाणीसह / तात्पुरत्या निवा-याची/पत्राशेडची अथवा रोख रकमेबाबतची सुविधा देणेत येणार आहेत.
- सुविधा क्षेत्र(HIKES) विकसकाने विकसित करावयाचे आहे.
- सदर प्रकल्पाची मुदत कामाचे आदेश झाल्यापासून ५ वर्ष राहील व सल्लागाराने विहीत मुदतीत प्रकल्पा पूर्ण करणे बंधनकारक राहील.

गांधीनगर झोपडपट्टी पुनर्वसन/पुर्नर्निर्माण प्रकल्पातील सदनिकांची माहिती

| अ क्र. | | इमारती | | | सदनिका | | | | सुविधा(चौ.फुट) | एकूणक्षेत्रफळ (चौ.फुट) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रकार | मजले | संख्या | रहिवाशी | क्षेत्रफळ (चौ.फुट) | वाणिज्य | बालवाडी, वेल फेयर सेंटर इ. | | |
| १ | पुनर्वसना साठी बांधकाम | ३ | ११ | ५ | १८२९ | ३०० | २०३ | ९० | ४३०५६ | १०९३७५४ |
| २ | विक्री साठीचा बांधकाम | २ | २० | ३ | ४७६ | ४५० चौ.फुट ते ६०० चौ.फुट | ३४४ | | | ५७३५९२ |
| ३ | टी.डी.आर | | | | | | | | | २६१५७५० |
| | | | | ८ | २३०५ | | ५४७ | ९० | ४३०५६ | |

तरी गांधीनगर येथील झोपडपट्टीचे पुनर्वसन/पुनर्निर्माण करणेकामी येणा-या प्रकल्प् किंमत र.रु.५०७.९० कोटी व सदर प्रकल्पा पंतप्रधान आवास योजना घटक क्र.१ अंतर्गत राबविणेकरिता जागेवर मनपाचे विविध आरक्षण असलेमुळे जागा मालकास जागा ताब्यात घेणेकामी मोबदला घावा लागणार आहे. त्यासाठी अंदाजे र.रु.१०० कोटी खर्च अपेक्षित आहे. तरी प्रकल्पाच्या Concept & Feasibility Report ला मान्यता तसेच त्यानुसार विस्तृत प्रकल्प आराखडा (DPR) तयार करुन येणा-या खर्चास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता सदर ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( **प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे** )
**सभापती**
शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/३५५/२०२०
दिनांक : ११/१२/२०२०

(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.